## माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान,सांगोला

नोंदणी क्र. F ७८१

देशपांडे गल्ली,केळकर हॉस्पिटल समोर,
मु.पो. सांगोला,जि. सोलापूर

# ठळक घडामोडी - एप्रिल 2023 ते जून 2023

सादर सस्नेह नमस्कार,

आपल्यासारख्या अनेक हितचिंतक देणगीदारांच्या आर्थिक सहकार्याने संस्थेची वाटचाल सुकर झाली आहे.

आज आपल्यापुढे संस्थेच्या 'एप्रिल 2023 ते जून 2023' च्या विभागवार ठळक घडामोडी सादर करीत आहोत.

## अ) महिला सबलीकरण

**1) आरोग्य** - अ) मा. ना. श्री चंद्रकांतदादा पाटील, उच्च तंत्रशिक्षण व वस्त्रोद्योग आणि संसदीय मंत्री, महाराष्ट्र राज्य पुरस्कृत माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान आणि डॉ. केळकर हॉस्पिटल सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. केळकर हॉस्पिटल मध्ये सुरु असलेल्या 'मोफत शस्त्रक्रिया योजनेत' 18 महिला व 2 बालकांवर यशस्वी शस्त्रक्रिया

- सांगोला येथे 35 महिलांची मोफत हिमोग्लोबिन आणि रक्तातील साखरेची तपासणी

ब) किशोर किशोरी विकास - अचकदाणी येथे किशोर किशोरी मेळावा संपन्न.

- डॉ. श्रीकांत देशपांडे यांचे मुलांना मानसिक, शारीरिक विकासावर मार्गदर्शन.
- हस्तव्यवसायामध्ये मुलांना घोटीव कागदाचे तोरण व फुले तसेच फाईल तयार करण्याचे प्रशिक्षण संपन्न.
- मुलींशी 'आत्मपरीक्षण व वेळेचा सदुपयोग' यांबाबत चर्चात्मक संवाद
- चित्रकला वही व स्केच पेन वाटप.





**2) अन्यायाविरुद्ध संघर्ष -** संस्थेच्या महिला समुपदेशन केंद्रात तीन महिन्यात 113 तक्रारींवर समुपदेशन

**3) कौशल्य विकसन केंद्र -** कौशल्य विकसन केंद्रात मेंदी आणि रांगोळी चे प्रशिक्षण संपन्न.
प्रशिक्षणार्थी - 35

- आषाढी एकादशी निमित्त कौशल्य विकसन केंद्रात वारकऱ्यांसाठी विठ्ठलाच्या चित्राचे पेंटिंग केलेल्या शबनम बॅग आणि गांधी टोपी विक्रीस उपलब्ध

**4) आर्थिक स्वावलंबन -** प्रा. यामातो कावाकामी फाउंडेशन,पुणे तर्फे बचतगटातील 64 महिलांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

- संस्थेच्या बचतगटातील पाच महिला सभासदांना शासनातर्फे पु. अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पुरस्कार प्रदान

**5) पर्यावरण साक्षरता -** 'गार्डी' येथे सेवावर्धिनी आणि 'Atlas Copco' यांच्या कडून संस्थेने केलेल्या जलसंधारण कामाची पाहणी. या वेळी 'Atlas Copco' च्या स्वीडन येथील लेखापरीक्षक श्रीमती इरिका मोलीन यांची उपस्थिती. यावेळी त्यांचेकडून गार्डी येथील काम पाहून समाधान व्यक्त







## ब) दर्जेदार शिक्षण -

- इ. 4 थी च्या 'मंथन' परीक्षेत निसर्ग फुले राज्यात दुसऱ्या व श्रीहरी दीपक भाकरे राज्यात सहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण .



डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत उत्कर्ष विद्यालयातील इयत्ता नववीचा विद्यार्थी चि. वेदांत गडदे यास सुवर्ण पदक

- उत्कर्ष पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयामध्ये अनुक्रमे खेळांगण आणि वासंतिक वर्गांचे आयोजन
- उत्कर्ष विद्यालयाची एसएससी बोर्ड परीक्षेची सलग सहाव्या वर्षी 100% निकालाची परंपरा कायम
- 90 % पेक्षा जास्त गुण मिळालेले विद्यार्थी 48%
- 70 % पेक्षा जास्त गुण मिळालेले विद्यार्थी 88%
- उत्कर्ष शाळेत नवीन शैक्षणिक वर्ष सुरु.
- 'सेवा इंटरनॅशनल' आयोजित विज्ञान शिबिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून उत्कर्ष विद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची निवड. 'कुप्पम' (आंध्रप्रदेश) येथे पाच दिवसीय या शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग.
- आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यालयात बाल वारकऱ्यांचा दिंडी सोहळा संपन्न
- 'कर्नाळा चॅरीटेबल ट्रस्ट, पुणे' यांच्या कडून उत्कर्ष शाळेत '2000 क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले.
- आंतरराष्ट्रीय योगदिन विद्यालयात उत्साहाने साजरा

- **विशेष घडामोडी -**

- राष्ट्रीय सेवा भारतीने केशव विद्यापीठ, जामडोली, जयपूर येथे दि. 7,8,9 एप्रिल 2023 आयोजित केलेल्या तीन दिवसीय 'राष्ट्रीय सेवा संगम' कार्यक्रमात आपले विश्वस्त, मुख्याध्यापक आणि मुख्याधिकारी यांचा सहभाग.
- 'देणे समाजाचे' एक सद्भावना महोत्सवा'तून एका देणगीदारांकडून 2 'Water Purifier' ची संस्थेस देणगी
- संस्थेच्या पदाधिकारी आणि सर्व कर्मचारी यांचा 'सन 2023 - 24 साठीचा दिशादर्शक' कार्यक्रम संपन्न

- **पाहुणे भेट -**

- संस्थेची देणगीदार कंपनी 'Inductotherm' चे अध्यक्ष श्री. सत्येन प्रभू यांची सपत्निक संस्था आणि शाळेस भेट

या घडामोडींशिवाय इतर अनेक छोटे छोटे उपक्रम आपल्या समर्थ हातांमुळे यशस्वी होत आहेत. आपल्या 'सत्पात्री' दानाचा योग्य प्रकारे विनियोग होत आहे याची खात्री असावी.

देणगीसाठी तपशील खालील प्रमाणे -

1) Money Transfer - देणगी साठी संस्थेच्या बँक खात्याचा तपशील-

खात्याचे नाव - माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, बँकेचे नाव- बँक ऑफ महाराष्ट्र

खाते क्रमांक - 60046857205 , IFSC No. – MAHB 0001467

2) संस्थेच्या matabalak.org या वेबसाईट वरून 'Donate Us' मधून देणगी देऊ शकता.

आपल्या मदतीची वाट पहात आहोत. लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

संपर्कासाठी मोबाईल क्र. 7588222250(WA)

धन्यवाद !

आपली स्नेहांकित,

डॉ. संजीवनी केळकर

अध्यक्षा

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला